


# आरोग्य विभाग जिल्हा परिषद कोल्हापूर मार्फत जनहितार्थ माहिती सादर

## नागरिकांसाठी आजारांबद्दल मराठीत माहिती २०२५



श्री. प्रकाश आबिटकर
माननीय मंत्री, सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण महाराष्ट्र राज्य

# क्षयरोग बद्दल माहिती



क्षयरोग (TB) हा हवेने पसरणारा गंभीर पण उपचाराने पूर्णपणे बरा होणारा आजार आहे. लवकर तपासणी व वेळेवर औषधे हेच त्यावरचे प्रभावी उपाय आहेत. खाली TB विषयी थोडक्यात माहिती दिली आहे.

## क्षयरोग म्हणजे काय ?

क्षयरोग (Tuberculosis/TB) हा Mycobacterium tuberculosis नावाच्या जंतूमुळे होणारा संसर्गजन्य आजार आहे. तो प्रामुख्याने फुफ्फुसांना (फुफ्फुस क्षयरोग) होतो, पण शरीराच्या इतर अवयवांनाही होऊ शकतो.



## ? क्षयरोग कसा पसरतो?

उत्तर: हा आजार प्रामुख्याने हवा व थुंकीद्वारे पसरतो.

- TB रुग्ण खोकला, शिंकला किंवा जोरात बोलला तर हवेत सूक्ष्मजंतू पसरतात.
- आसपासच्या लोकांनी ती हवा श्वसनाद्वारे घेतली तर त्यांना TB होऊ शकतो.

## ? क्षयरोगाची मुख्य लक्षणे कोणती?

उत्तर: २ आठवड्यांपेक्षा जास्त काळ चालणारा खोकला

- ताप (विशेषतः संध्याकाळी)
- वजन कमी होणे
- भूक कमी होणे
- रात्री घाम येणे
- रक्ताळ खोकला (काही प्रकरणात)
-

## ? क्षयरोगाची तपासणी कशी होते?

उत्तर: सरकारी व मोफत तपासणी केंद्रांमध्ये खालील चाचण्या केल्या जातात –

- थुंकी तपासणी (Microscopy/CBNAAT)
- छातीचा एक्स-रे
- इतर आवश्यक रक्त/शरीरातील द्रव तपासण्या



**❓ क्षयरोग बरा होतो का?**

उत्तर: हो, TB पूर्णपणे बरा होतो जर उपचार वेळेवर व पूर्ण घेतले तर.

**❓ TB चे उपचार किती दिवस चालतात?**

उत्तर: १.साधारणतः ६ महिने किंवा काही विशेष प्रकरणात ९-१२ महिने.
२.सरकारी TB केंद्रात औषधे मोफत दिली जातात.

**❓ उपचार मध्येच थांबवले तर काय होते?**

उत्तर: औषधे अपुरी घेतल्यास TB परत होऊ शकतो व जंतू औषधांना प्रतिकारक (Drug-resistant TB) होऊ शकतात, ज्यावर उपचार कठीण व जास्त दिवसांचे असतात.



❓ **TB टाळण्यासाठी काय करावे?**

उत्तर:

- TB रुग्णाने नेहमी तोंडावर रुमाल/मास्क वापरावा.
- घरात हवा खेळती ठेवावी.
- संतुलित आहार घ्यावा व प्रतिकारशक्ती वाढवावी.
- आजाराची लक्षणे दिसताच त्वरित तपासणी करावी.

❓ **TB रुग्णाला वेगळे ठेवावे का?**

उत्तर:

- प्रारंभीच्या काही आठवड्यात रुग्णाने स्वतंत्र खोलीत राहणे व मास्क वापरणे चांगले.
- औषधोपचार सुरू केल्यानंतर संसर्ग पसरवण्याची शक्यता कमी होते.

❓ **TB रुग्णाला पोषण सहाय्य मिळते का?**

उत्तर: हो, निक्षय पोषण योजना अंतर्गत TB रुग्णाला दरमहा ₹500 थेट बँक खात्यात दिले जाते.



❓ **TB लसीकरण आहे का?**

उत्तर:

- हो, जन्मानंतर BCG लस दिली जाते, जी लहान मुलांमध्ये TB च्या गंभीर प्रकारांपासून संरक्षण देते.

❓ **TB संदर्भातील मदत व माहिती कुठे मिळेल?**

उत्तर:

- जवळच्या प्राथमिक आरोग्य केंद्रात, ग्रामीण/शहरी रुग्णालयात किंवा जिल्हा क्षयरोग केंद्रात

- राष्ट्रीय क्षयरोग निर्मूलन कार्यक्रम (NTEP) हेल्पलाइन: 1800-11-6666

❓ **TB रुग्णाला पोषण सहाय्य मिळते का?**

उत्तर: हो, निक्षय पोषण योजना अंतर्गत TB रुग्णाला दरमहा ₹500 थेट बँक खात्यात दिले जाते.





# पौष्टिक अन्न खा,
# टीबी
# सोबत लढण्याची ताकद मिळवा

टीबीमुळे शरीराची रोगांशी लढण्याची शक्ती कमी होते. सोबतच त्याच्या उपचारासाठी खूप साऱ्या औषधी घ्याव्या लागतात. त्यामुळे उपचारादरम्यान पौष्टिक अन्न खाणे गरजेचे आहे.

**टीबीची लक्षणे**

- सलग दोन आठवड्यापेक्षा जास्त खोकला
- ताप
- रात्री घाम येणे
- झोप न येणे
- वजन अचानक कमी होणे

टीबीचा आधुनिक व संपूर्ण उपचार शासकीय आरोग्य केंद्रावर मोफत उपलब्ध आहे.

## टीबी हरेल, देश जिंकेल.

सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन

DOTS Pura course, Pakka ilaaj

NHM

PROTECTING THE NATION FROM EPIDEMICS · INTEGRATED DISEASE SURVEILLANCE PROGRAMME · IDSP



# सुप्त अवस्थेतील टीबी ची तपासणी

भारतात सुमारे 35 ते 40 कोटी लोकांना सुप्त अवस्थेतील टीबी चा संसर्ग आहे, त्यापैकी दरवर्षी 26 लाख (18 ते 36 लाख लोकांना) टीबी होतो असा अंदाज आहे. त्यापैकी तुम्ही एक असू शकतात,

टीबी रुग्णाच्या कुटुंबातील आणि संपर्कात येणाऱ्या व्यक्तींची सुप्त अवस्थेतील टीबी ची तपासणी करणे

**त्वचेच्या व रक्ताच्या चाचणीद्वारे सुप्त अवस्थेतील टीबी चे निदान करता येते.**

सुप्त अवस्थेतील टीबी च्या संसर्गावर उपचार केल्याने टीबी चा प्रतिबंध होतो



**लक्षात ठेवा! टीबीचे लवकर निदान व उपचार, निरोगी राहील आपला परिवार!!**

टीबी हरेल देश जिंकेल

सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन

अधिक माहितीसाठी टोल फ्री हेल्पलाईन क्रमांक (क्षयरोग) १८००११६६६६

/MahaArogyaIECBureau @MahaHealthIEC /mahahealthiec /MahaHealthIEC

राज्य आरोग्य शिक्षण व संपर्क विभाग, पुणे





## तुम्हाला टीबी कसा होतो ?

लहान मुलांना टीबीचे संक्रमण झालेल्या प्रौढ व्यक्ति कडून टीबी होतो.

**लक्षात ठेवा! लवकर निदान–लवकर उपचार, निरोगी ठेवा आपला परिवार!!**

आपल्या घरी येणाऱ्या प्रशिक्षित स्वयंसेवकांकडून तपासणी करून घ्यावी आणि त्यांना सहकार्य करावे.

राष्ट्रीय कुष्ठरोग निर्मुलन कार्यक्रम

सार्वजनिक आरोग्य विभाग,
महाराष्ट्र शासन

अधिक माहितीसाठी टोल फ्री हेल्पलाईन क्रमांक (कुष्ठरोग) ०२२–२४११४०००, (क्षयरोग) १८००११६६६६

## लहान मुलांना टीबी कसा होतो ?

काही मुलांना टीबी होण्याची जोखीम उच्च असते.




**लक्षात ठेवा! लवकर निदान–लवकर उपचार, निरोगी ठेवा आपला परिवार!!**

आपल्या घरी येणाऱ्या प्रशिक्षित स्वयंसेवकांकडून तपासणी करून घ्यावी आणि त्यांना सहकार्य करावे.

राष्ट्रीय कुष्ठरोग निर्मुलन कार्यक्रम

सार्वजनिक आरोग्य विभाग,
महाराष्ट्र शासन

अधिक माहितीसाठी टोल फ्री हेल्पलाईन क्रमांक (कुष्ठरोग) ०२२–२४११४०००, (क्षयरोग) १८००११६६६६